# कृपेचा एक स्पर्शनीय अनुभव

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

*अलीकडेच, 'मंदिरात राहा' या सत्संगांच्या थेट प्रक्षेपणाची व्यवस्थापकीय संचालक, रोहिणी मेनन हिला मी माझ्या एका अद्भुत अनुभवाविषयी सांगितले, जो अनुभव मला गुढीपाडव्याच्या दिवशी मंदिरात आला होता. गुढीपाडवा हा भारतीय पंचांगानुसार सर्वाधिक शुभ असलेल्या साडेतीन दिवसांपैकी एक दिवस आहे. आपला हा अनुभव मी जेव्हा रोहिणीला सांगितला, तेव्हा तिने मला विचारले की हा अनुभव सिद्धयोग संघम्‌मध्ये सांगण्यास माझी संमती आहे का? मी माझी संमती दर्शविली—तर आता इथे प्रस्तुत आहे हा अनुभव.*

श्री मुक्तानंद आश्रमातील बडे बाबांच्या मंदिरात त्यांना वंदन करून मी माझे आसन ग्रहण केले. काही क्षणांनंतर सहजच माझी दृष्टी उजव्या बाजूला वळली, तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर मी असे दृश्य पाहिले—शिव नटराजाच्या मूर्तीसमोर असलेल्या अग्निकुंडातून रिबिनीच्या आकारात निर्मळ धुराची वलये बाहेर पडत होती. तो धूर अतिशय नाजूक होता. जो थोडासा नीळसर-पांढरा, थोडा पांढरट-निळा होता. मी मंत्रमुग्ध झाले होते.

काही क्षण मी त्या दृश्याच्या सौंदर्याचे रसपान करीत राहिले. मग मी विचार केला 'माझी इच्छा आहे की, व्हिडिओचे थेट प्रक्षेपण सुरू होण्यापूर्वी सर्व लोकांनी या नैसर्गिक सुंदरतेचा आनंद घ्यावा.'

सत्संगात सहभागी झालेल्या मंदिरातील सर्वांना, मी सांगितले की त्यांनी भगवान नटराजांच्या समोरील त्या भव्य आणि पारदर्शी अशा धुराच्या वलयांकडे पाहावे. मागे वळून सर्वजण जेव्हा नृत्य करणाऱ्या त्या धुराचे सौंदर्य पाहत होते, तेव्हा 'आह' असा मधुर स्वर वातावरणात गुंजायमान झाला. माझे लक्ष माझ्या नजरेसमोरच बसलेल्या त्या व्यक्तीकडेदेखील गेले, ज्या व्यक्तीने त्या धुरासारख्याच नीळसर-पांढऱ्या रंगाचे कपडे घातले होते. भगवान नित्यानंदांच्या मंदिरात बसून आम्ही जेव्हा गुढीपाडव्याच्या पावन दिवसाचा उत्सव साजरा करण्यासाठी सिद्धयोग वैश्विक हॉलमध्ये सर्वांसमवेत जोडले जाण्याच्या प्रतीक्षेत होतो, तेव्हा ते माझ्यासाठी फार हृदयस्पर्शी होते की उदित होणाऱ्या धुराच्या रूपात भगवान नटराजांचे नृत्य पाहण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले.

नंतर सत्संगात, मी सर्वांना बडे बाबांच्या स्वर्णिम स्वरूपावर ध्यान करण्यासाठी आमंत्रित केले. ध्यानादरम्यान माझे डोळे बडे बाबांच्या मंदस्मित करणाऱ्या चेहऱ्यावर खिळले होते. काही क्षणातच, मी पाहिले की मंदिरात केवळ बडे बाबांचे स्वरूपच दृश्यमान होते—कारण संपूर्ण मंदिर त्याच मृदुल, कोमल, नाजूक, स्पंदित होणाऱ्या नीळसर-पांढऱ्या धुराने व्याप्त झाले होते, जो धूर भगवान शिव नटराजांच्या मूर्तीसमोरील अग्निकुंडातून बाहेर पडत होता. या नीलप्रकाशाचे कण हवेत चमचमत होते, नृत्य करत होते. त्यांनी बडे बाबांच्या अस्तित्वाच्या सभोवताली असा आकार धारण केला होता की, जणू काही उलटा लटकणारा पाण्याचा थेंब. मी या ज्ञानाने स्तिमित झाले होते की भगवान नटराजांच्या समोरील धूर स्वतःहून मंदिरात आला होता. नीळसर दीप्ती संपूर्ण ध्यानादरम्यान आपल्यासमवेत टिकून राहिली होती.

हा अनुभव शुद्धिकारकदेखील होता आणि रोमांचकारीदेखील. अशा ऊर्जेने व्यापून जाणे म्हणजे प्रभु-प्रेमाने सिक्त होणेच होते.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.